| MHKO070003822026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९/२०२६ मधील नि.क्र.१ वरील आदेश**<br>**विद्यासागर पांडुरंग पाटील वगैरे वि. कोणीही नाही.** |
|---|---|

अर्जदार यांनी सदरचा अर्ज त्यांचे वडील मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी सदर केलेला आहे.

२. अर्जदार यांनी सदरचे अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हा मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचा मुलगा असून अर्जदार नं.२ व ३ या मुली आहेत. मयत कै.पांडुरंग शंकर पाटील हे दि.२७/०४/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. तसेच त्यापुर्वी अर्जदारांची आई कै.कुसुम पांडुरंग पाटील या दि.१५/११/२०१४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांच्या पश्चात त्यांना अर्जदार नं.१ ते ३ हेच हिंदू वारसा कायद्याप्रमाणे वर्ग-१ चे सरळ व कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदार पुढे असे कथन करतात की, मयत कै.पांडुरंग शंकर पाटील हे शेत विणकर सूत कर्मचारी सहकारी क्रेडीट सोसायटी, यड्राव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेत सचिव म्हणून काम करत होते. सन २००० मध्ये ते कार्यमुक्त झाले होते. मयत कै.पांडुरंग शंकर पाटील हे नोकरीत असताना त्यांचे पगारातून पी.एफ. रक्कम स्वरुपात कपात हेऊन त्यांचे पी.एफ. खाते नं.PU/KOL/००२९४८/०००/००००००४ (२९२४८/४) या खातेवर अंदाजे रक्कम रु.१,७०,०००/- जमा झालेली आहे. ई.पी.एफ. ऑफीस कोल्हापूर विभागाकडून सदर पी.एफ. रक्कम मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे बँक खातेवर अद्याप जमा झालेली नाही.

**४.** अर्जदार पुढे असे कथन करतात की, अर्जदार नं.१ यांनी सदर पी.एफ. ची रक्कम मिळणेकरीता पी.एफ. ऑफीस कोल्हापूर येथे रितसर लेखी अर्ज केला होता. त्यामध्ये अर्जदार नं.१ यांनी सदर खात्यामध्ये किती रक्कम आहे व सदर रक्कम त्यांचे खातेवर जमा करणेबाबत नमूद केले होते. परंतु त्यावेळी पी.एफ.ऑफीस कोल्हापूर यांचेकडून अर्जदार यांना मे.कोर्टाकडून वारसा दाखला आणणेबाबत सांगितले आहे. तसेच मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे नांवे कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जि.कोल्हापूर या बँकेत त्यांचे खातेवर रक्कम रु.६,९४२/– शिल्लक आहेत. तसेच श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.शिरोळ व जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.हुपरी या कारखान्यांचे शेअर्स मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे नांवे आहेत. सबब, अर्जदार नं.१ ते ३ यांचा अर्ज मंजूर करणे विषयी तसेच अर्जदार नं.१ यांचे नांवे वारसा दाखला मिळणेसाठी अर्जदार नं.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**५.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. आर.एम.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरिता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारण मीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| **अनु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ३ हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेस पात्र आहेत का ? | **होय** |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ बाबत.**

६. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाणी क्र.११** अन्वये दाखल केले आहे. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी अर्जदार यांनी मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची मुळ प्रत **निशाणी क्र. १७** वर, मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांच्या पत्नी कै.कुसुम पांडुरंग पाटील यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची मुळ प्रत **निशाणी क्र.१८** वर, तसेच अर्जदार यांचे वडीलांचे आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत **निशाणी क्र.१९** वर, अर्जदार नं. १ ते ३ यांच्या आधारकार्डांच्या व्हेरीफाईड प्रती अनुक्रमे **निशाणी क्र.२० ते २२** वर, अर्जदारांचे वडीलांचे बँक पासबुक **निशाणी क्र.२३** वर तसेच अर्जदारांच्या वडीलांचे शेअर्स सर्टीफिकेटची व्हेरीफाईड प्रत **निशाणी क्र.२४** वर इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदार यांनी पुरावा बंद ची पुरसीस दिलेली आहे.

७. सदर प्रकरणात अर्जदार यांनी दैनिक जनप्रवास **(निशाणी २५)** या वर्तमानपत्रामध्ये दि.१२/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस काढून हरकती मागितल्या. तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर जाहीरनामा व जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धी नंतरही आजपावेतो इतर कोणीही अर्जदार हे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे वारस नाहीत अशी हरकत उपस्थित केलेली नाही. तसेच नि.क्र.७ कडे बेलीफ यांनी जाहीरनामा हा मयताचे घरावर दर्शनी भागावर, गाव चावडी येथे व न्यायायलातील नोटीस बोर्डावर प्रसिध्द केल्याबाबतचा अहवाल नि.क्र.७ कडे दाखल आहे. तरी देखील प्रस्तुत अर्जदार हे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे वारस नाहीत अशी हरकत उपस्थित केलेली नाही.

८. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.११** अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात त्यांच्या अर्जातील कथनाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन

केल्या आहेत. **निशाणी १७** वर दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कै.पांडुरंग शंकर पाटील हे जांभळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे मयत झालेले आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ हा मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचा मुलगा, तर अर्जदार क्र. २ व ३ या मुली आहेत. त्यामुळे अर्जदार नं.१ ते ३ हे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे पश्चात त्यांचे वर्ग –१ चे वारस असल्याचे दिसून येते.

**९.** अर्जदाराचा तोंडी पुरावा व संपुर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, व वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता तसेच अर्जदार क्र. १ ते ३ व मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचेमधील नातेसंबंध पाहता अर्जदार क्र. १ ते ३ हे सकृतदर्शनी मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे वारस असल्याचे दिसून येते.

**१०.** अर्जदार हे मुंबई नियमन कलम १ व २ अन्वये दाखल मिळण्यास पात्र ठरतात. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाहीत. मे. मुंबई उच्च न्यायालयाने अनेक निवड्यामध्ये वारसा प्रमाणपत्र हे फॉर्मल रिकग्निशन (formal) असल्याचे म्हंटलेले आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** अर्जदार क्र. १. **विद्यासागर पांडुरंग पाटील,** अर्जदार क्र. २. **सौ.पुष्पाताई रविंद्र माने** आणि अर्जदार क्र. ३. **प्रियंका अविनाश पवार** हे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते.

**३.** अर्जदार क्र. १. **विद्यासागर पांडुरंग पाटील,** अर्जदार क्र. २. **सौ.पुष्पाताई रविंद्र माने** आणि अर्जदार क्र. ३. **प्रियंका अविनाश पवार** हे मयत कै.पांडुरंग शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना त्यांचे नावे, मुंबई नियमन कायदा, १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे व परीशीष्ट 'ब' मधील विहित नमुन्यामध्ये, योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात यावे.

**४.** वारसा प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी.

SUKRUT SANJAY MHATARMARE

Digitally signed by SUKRUT SANJAY MHATARMARE
Date: 2026.07.07 15:55:22 +0530

जयसिंगपुर.

दिनांक - ०७. ०७.२०२६.

**(सुकृत सं. म्हातारमारे)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
जयसिंगपुर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर